महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका खंड-४ मधील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती विषयक गाव नमुना नं.८-अ मध्ये सुधारणा करण्याबाबत......................

**पोटखराब क्षेत्र समाविष्ट करण्याकरीता**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१८/प्र.क्र. ६७/ज-१ अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक: १८ एप्रिल, २०१८**

**वाचा** -

**१)** महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका खंड-४ भाग (दोन) यांमधील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती

**२)** महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१.

**प्रस्तावना** -

महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) मधील भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती या विषयी आहे. त्यानुसार ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन करण्याकरीता, विविध नोंदवह्यांचा गाव नमुना व दुय्यम नोंदवह्या यांचे नमुने विहीत करण्यात आलेले असुन त्याचा गोषवारा देखील देण्यात आलेला आहे.

- गाव नमुना नंबर- ७ हा अधिकार अभिलेख या विषयी आहे.
- गाव नमुना नंबर- १२ हा पिकांची नोंदवही या विषयी आहे.
- गाव नमुना नंबर- ८ अ धारण जमिनींची नोंदवही या विषयी आहे.

राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती यांमधील, गाव नमुना नंबर- ७ हा अधिकार अभिलेख या विषयी असून यामध्ये, संबंधीत जमिनीच्या भोगवटादार यांचे नाव, शेतीचे स्थानिक नाव, भुमापन क्रमांक, भुधारणा पध्दती, धारण क्षेत्राचा तपशिल [लागवडी योग्य क्षेत्र, पोटखराब क्षेत्र (लागवडी योग्य नसलेले), एकूण क्षेत्र] , आकारणी, जुडी किंवा विशेष आकारणी, खाते क्रमांक, कुळाचे नांव, इतर अधिकार या ठळक बाबीचा तपशिल समाविष्ट आहे. तर, गाव नमुना नं.८-अ हा धारण जमिनीची नोंदवही असून, यासंबंधी खुलासा पाहता, सद्यस्थितीत गाव नमुना नं ८-अ मध्ये केवळ लागवडीयोग्य क्षेत्राचा अंतर्भाव करता येतो.

राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती यांमधील गाव नमुना नं.७ /१२ च्या गाव नमुना नं.७ मधील आणि गाव नमुना नं. ८-अ मधील धारण क्षेत्र आणि त्याविषयीचे रकाने सारखेच असणे आणि त्यामधील तपशिल देखील एकसमान राहण्याकरीता, क्षेत्र विषयक आकडेवारी जुळण्याची आवश्यकता आहे. तसे झाल्यास गा.न.नं. ७/१२ च्या संगणकीकरणाच्या प्रक्रीयेत, गाव नमुना नं.७/१२ मध्ये



Scanned with OKEN Scanner

नमूद धारण क्षेत्र, लागवडी योग्य क्षेत्र आणि पोटखराब क्षेत्र या रकान्यांना थेट गाव नमुना नं. ८-अ मधील संबंधीत राकान्याशी संगणक प्रणालीन्वये संलग्न करण्यास मदत होईल.

या बाबी विचारात घेवून, गाव नमुना नं.७ व गाव नमुना नं.८-अ मधील क्षेत्रात साम्य ठेवण्याकरीता गाव नमुना नं.८-अ मधील स्तंभ क्र.३ - क्षेत्र या स्तंभात (३अ) लागवडी योग्य क्षेत्र, (३ब) पोटखराब क्षेत्र (लागवडी योग्य नसलेले) आणि (३क) एकूण क्षेत्र असे तीन उपस्तंभ करून, त्यामध्ये पोटखराब क्षेत्राचा समावेश करण्यात यावा. तसेच - रकाना क्र. (३अ) मधील लागवडी योग्य क्षेत्र हेच आकारणीस पात्र क्षेत्र राहील, पोटखराब क्षेत्रावर आकारणी लागू नाही. अशा स्वरूपाचे दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> -**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) च्या भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती मधील **गाव नमुना आठ-अ धारण जमिनीची नोंदवही (आसामीवार खतावणी- जमाबंदी पत्रक) या नोंदवहीचा सुधारीत नमुना या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहे.**

**गाव नमुना आठ-अ**
**धारण जमिनीची नोंदवही**
**(आसामीवार खतावणी- जमाबंदी पत्रक)**

**खाते क्रमांक :** **खातेधारकाचे नाव :**

| गाव नमुना सहा मधील नोंद | भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक | धारण क्षेत्र | | | वसुलीसाठी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडी योग्य क्षेत्र | पोटखराब क्षेत्र (लागवडी योग्य नसलेले) | एकूण क्षेत्र | आकारणी किंवा जुडी | दुमाला जमिनीवरील नुकसान | स्थानिक उपकर | | |
| | | | | | | | जि.प. | ग्रा.प. | |
| (१) | (२) | (३अ) | (३ब) | (३क) | (४) | (५) | (६अ) | (६ब) | (७) |
| | | हे.आर. | हे.आर. | हे.आर. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. |
| | | | | | | | | | |

***टिप:- उक्त रकाना क्र. (३अ) मधील लागवडी योग्य क्षेत्र हेच आकारणीस पात्र क्षेत्र राहील, पोटखराब क्षेत्रावर आकारणी लागू नाही.***

**०२.** महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ मधील नियम २ नुसार उक्त नमुन्याच्या रकाना क्र. (३अ) मधील लागवडी योग्य क्षेत्र हेच संबंधित जमिनीच्या आकारणीस पात्र क्षेत्र राहील.

**०३.** महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) च्या भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील तरतूदीनुसार गाव नमुना आठ-अ - धारण जमिनीची नोंदवही (आसामीवार खतावणी- जमाबंदी पत्रक) ही क्षेत्रीय पातळीवर प्रत्येक साझात उक्त नमूद *सुधारीत नमुन्यात ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच* जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र



Scanned with OKEN Scanner

राज्य, पुणे, यांनी गा.न.नं. ७/१२ च्या संगणकीकरणाच्या प्रक्रीया यांमध्ये देखील या नमुन्यानुसार आवश्यक त्या सुधारणा संबंधितांकडून करून घेण्याची दक्षता घ्यावी.

**०४.** सर्व जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

**०५.** सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित जिल्ह्यात, यासंदर्भात वरीलप्रमाणे सुधारीत नमुना लागू करण्याच्या कार्यवाहीचा मासिक बैठकीमध्ये आढावा घ्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०४१८१२२९२०१३१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**राजेंद्र क्षीरसागर**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
६) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,३२
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
९) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२,
१४) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१५) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
१६) सर्व सहसचिव /उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१७) "ज" समूहातील सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१८) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

*******



Scanned with OKEN Scanner